# कृषि विज्ञान केंद्र

## मराठवाडा शेती सहाय्य मंडळ, खरपुडी, जालना

# विकसित कृषि संकल्प अभियान, खरीप - २०२५

## रूंद वरंबा-सरी टोकण यंत्र-बीबीएफ पेरणी तंत्रज्ञान

**बी.बी.एफ. पेरणी तंत्रज्ञान :-**

शेत जमिनीमध्ये सरी व गादीवाफा यंत्राने तयार करून गादीवाफ्यावर बियाण्याची लागवड अथवा पेरणी करणे. यालाच रूंद वरंबा पेरणी तंत्रज्ञान असेही म्हणतात.

**बी.बी.एफ. यंत्राची गरज :-**

- जमिनीतील अधिक कठीणपणा.
- जमिनीमध्ये पाण्याचा योग्य निचरा होण्याचा अभाव.
- अतिरितक्त पावसाचे पाणी योग्यरित्या शेतीच्या बाहेर न जाणे.
- मुळाची अयोग्य वाढ.
- उत्पादन घट.

**बी.बी.एफ. यंत्राची कार्यपध्दती :-**

- रूंद गादीवाफा तयार करणे.
- दोन्ही बाजूस दोन सऱ्या पाडणे.
- सोबत एक अथवा अधिक बियाण्याची टोकण पध्दतीने लागवड करणे.
- आंतरपिकाची पेरणी अथवला लागवड करणे.

**बी.बी.एफ. टोकणयंत्राचे कॅलीबेशन :-**

- तिरपी प्लेट पिकानुसार बसविणे
- दोन्ही बाजुचे रिजर सारख्या पातळीत घेणे.
- बाजुच्या चाकाची उंची जमिनीच्या मगदुरानुसार ठेवणे.
- मिटरींग सिस्टीमची चैन जास्त तानलेली किंवा सैल असू नये.

**बी.बी.एफ. यंत्र म्हणजे काय ?**

बी.बी.एफ. ब्रॉड बेड फेरो म्हणजेच रूंद सरी वरंबा टोकणयंत्र / पेरणी यंत्र

**बी.बी.एफ. यंत्राचे प्रकार :**

- ४ फणी बी.बी.एफ. टोकणयंत्र
- ५ फणी बी.बी.एफ. टोकणयंत्र
- ६ फणी बी.बी.एफ. टोकणयंत्र
- ७ फणी बी.बी.एफ. टोकणयंत्र

**बी.बी.एफ. टोकणयंत्राचे वैशिष्ट्ये :**

- बी.बी.एफ. यंत्राने विविध आकाराची, विभिन्न पेरणीचा एकरी दर असलेली पिके आवश्यक खोलीव व अंतरावर पेरणी करता येतात.
- दोन बियाणातील अंतर आवश्यकतेनुसर बदलता येते.
- आंतरपिकाची पेरणी करता येते.
- पावसाच्या खंडामध्ये मुलस्थानी जलसंधारण करता येते.
- अतिरिक्त पावसाचे पाणी बाजुच्या सऱ्याद्वारे सुरक्षितरित्या बाहेर काढता येते.
- गादीवाफा असल्यामुळे पिकाच्या मुळामध्ये वाढ होवून पिकाची वाढ जोमाने होते.
- गादीवाफामुळे जमिनीमध्ये सच्छिद्रता निर्माण होते.

## जमिनीचे चिभड कमी करण्यासाठी सब सॉयलर यंत्राचा वापर

**बी.बी.एफ. टोकणयंत्राचे वैशिष्ट्ये :**

- जमिनीचा चिभड कमी होते.
- जमिनीचा टणकपणा कमी होतो.
- जमिनीतील पाण्याचा निचरा लवकर होतो.
- जमिनीतील जलधारक्ष क्षमता वाढते.
- जमिनीतल वापसा लवकर होते.
- मुळांची वाढ चांगली होते.
- पिकांची वाढ जोमाने होते.
- पिकांच्या उत्पादनात वाढ होते.






✻ लेखन व संकलन ✻

प्रा. पंडित वासरे (कृषि अभियंता) मो. ९०२८२५४९५१

श्रीकृष्ण सोनुने (वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) मो. ९०२८२५४९४६